# महानगरपालिका शिक्षण विभाग ,नाशिक

कार्यालय –राजीव गांधी भवन४२२००२- नाशिक,शरणपूर रोड,

Email- nmcschoolboard@gmail.com,ssa_nmc@rediffmail.com


मनपा शिक्षण विभाग, नाशिक
आ क्र.............. दि..................
जा.क्र. 9८८५ ...दि. 2०/6/2०२४

प्रति,

१) केंद्रप्रमुख (सर्व), मनपा शिक्षण विभाग, नाशिक
२) मुख्याध्यापक (सर्व), मनपा प्राथमिक शाळा
३) मुख्याध्यापक (सर्व), मनपा माध्यमिक शाळा,
४) मुख्याध्यापक (सर्व), सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापन मनपा क्षेत्रातील सर्व शाळा
५) अंगणवाडी मुख्यसेविका, नाशिक महानगरपालिका, नाशिक

**विषय:-** शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करुन त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी दि. 5 जुलै 2024 ते 20 जुलै 2024 या कालावधीमध्ये सर्वेक्षण राबविण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत.

**संदर्भ:-** 1. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिसं/शाबा. सर्वेक्षण/2024/709/ 2024/4065 दि.11/6/2024

2. जा.क्र.सशि/सकाअ-2./02/2024 नाशिक दिनांक :- 19/06/2024

बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009, राज्यात दि. 1 एप्रिल 2010 रोजी कार्यान्वित झाला आहे. सदर कायद्यांतर्गत 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, बालकांनी नियमित शाळेत येणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे हा हक्क प्राप्त झाला आहे. शाळेत कधीही दाखल न झालेली तसेच शाळेत न जाणारी बालके ज्यांनी शाळेत प्रवेश घेतला नाही किंवा ज्या बालकांनी शाळेत प्रवेश घेतला नाही. अशा 6 ते 14 वयोगटातील राज्यात आजही अनेक बालके विविध कारणांमुळे शाळाबाहय आहेत.

नाशिक जिल्हयात अनेक तालुक्यांमधून मोठ्या प्रमाणात रोजगारानिमित्त कुटुंब स्थलांतरीत करीत असतात. स्थलांतराचा कालावधी हा माहे ऑक्टोंबर ते एप्रिल असा साधारणतः सहा महिन्यांचा असतो. ऊस तोडणी बरोबरच वीटभट्टी, दगडखाण, कोळसाखाणी, शेतमजूरी, कांदाचाळ, डाळींब व द्राक्षेबाग, बांधकाम व्यवसाय, सार्वजनिक बांधकामांतर्गत रस्ते व नाले दुरुस्ती व बांधकाम, जिनिंग मिल इ. अनेक प्रकारच्या कामांसाठी ही कुटुंबे स्थलांतर करीत असतात.

सदर कुटुंबासोबत शाळेत जाणारी मुले स्थलांतर करीत असल्यामुळे 5 ते 6 महिन्यांच्या कालावधीतील अनुपस्थितीमुळे बालके शिक्षणापासून वंचित राहतात, परिणामी मुले शाळा सोडून आपल्या आई वडिलांना रोजगारात व कामात मदत करतात. वाढत्या स्थलांतरामुळे बालके शाळाबाहय होत आहेत. तसेच बालमजूरी व बालविवाहाचे प्रमाण रोखण्याचे आव्हान आपल्या समोर आहे. यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे शाळाबाहय स्थलांतरीत व शाळेत अनियमित असलेल्या बालकांचे शोध मोहिम राबविण्याचा निर्णय उपरोक्त संदर्भान्वये शासनाने घेतलेला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

राज्यात शाळाबाहय अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करुन त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी दि. 5 जुलै 2024 ते 20 जुलै 2024 या कालावधीमध्ये सर्वेक्षण हाती घेण्याचे शासनाच्या सूचना आहेत. या महत्वपुर्ण शैक्षणिक उपक्रमात महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास, एकात्मिक बालविकास योजना, कामगार विभाग, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक

विकास आणि सार्वजनिक आरोग्य व गृह विभाग या विभागातील अधिका-यांच्या सहभागाने राबविण्याबाबत शासनाने कळविलेले आहे. संदर्भिय पत्रातील SOP मध्ये खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

1) **सर्वेक्षण कोठे करावे** :- सदर सर्वेक्षण कालावधीमध्ये शाळाबाहय अनियमित व स्थलांतरीत बालकांच्या नोंदी घरोघरी, प्रत्येक गावात, शहरात, गजबजलेल्या वस्त्या, रेल्वेस्टेशन, बस स्थानके, बाजार, गुहाळ-, घर, गावाबाहेरीच पाल, विटभट्ट्या, दगडखाण, मोठी बांधकामे, स्थलांतरीत कुटुंबे, झोपडया, फुटपाथ, सिग्नलवर, रेल्वेमध्ये, फुले व अन्य वस्तु विकणारी तसेच रस्त्यावर भिक मागणारी बालके, लोक कलावंतांची वस्ती, अस्थायी निवारा करणारी कुटुंबे, भटक्या जमाती, तेंदुपत्ता वेचणारी, विडया वळणारी इविविध ठिकाणी काम . करणारे बालमजूर, ऊसतोड कामगारांच्या वस्त्या, शेतमळयांवरील आणि जंगलातील वास्तव्य असलेल्या पालकांची बालके, मागास वंचित गटातील व अल्पसंख्यांक गटातील वस्तीतील मुले यांची माहिती या शोध मोहिमेत घेण्यात यावीमहिला बालविकासांतर्गत बालगृह निरीक्षण गृह विशेष दत्तक संस्था येथील मुलांमुलींचाही . या शोध मोहिमेत समावेश करण्यात यावास्थलांतरीत मूल शिक्षणापासून वंचित राहणार / एकही शाळाबाहय . नाही यादृष्टीने नियोजन करण्याची दक्षताकेंद्रप्रमुख / मुख्याध्यापक यांनी घ्यावी.
2) **शोध मोहिम जबाबदारी -:** केंद्रप्रमुखअंगणवाडी सेविका व मदतनीस यां ,शिक्षक ,मुख्याध्यापक ,ची जबाबदारी राहील.
3) **मोहिमेची अंमलबजावणी** :- तालुकास्तरावरील अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्या मदतीने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, यांच्या मार्फत 3 ते 18 वयोगटातील बालकांची शोध मोहिम पुर्ण करतील, सर्वेक्षण दि .5 जुलै 2024 ते 20 जुलै 2024 या कालावधीत करावयाचे असून संदर्भित पत्रात नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण यशस्वीरित्या पुर्ण होणसाठी सर्वेक्षणाला व्यापक जनप्रबोधन प्रसिध्दी, प्रचार, करण्यात यावे त्याकरीता .संनियंत्राणासाठी विविध स्तरावर समित्या गठन करण्यात आलेले आहे.

➢ **वार्ड स्तर -:**

| | |
|---|---|
| 1. स्थानिक नगरसेवक | अध्यक्ष |
| 2. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शाळा विकास व्यवस्थापन समिती अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| 3. क्षेत्रीय कार्यालयाचे उपायुक्त | सदस्य |
| 4. पर्यवेक्षक, शिक्षण विभाग, महानगरपालिका | सदस्य |
| 5. शासकीय कामगार अधिकारी | सदस्य |
| 6. आरोग्य सेवक | सदस्य |
| 7. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी शिक्षण तज्ञ-1, - | सदस्य |
| 8. सेवाजेष्ठ मुख्याध्यापक | सदस्य सचिव |

➢ **केंद्रस्तरीय समिती -:**

| | |
|---|---|
| 1. केंद्रप्रमुख | अध्यक्ष |
| 2. निवडक किमान 5 शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| 3. साधन व्यक्ती, समावेशित शिक्षण विषयतज्ञ | सदस्य |
| 4. बालरक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| 5. सीआरजी मधील रिसोर्स टिचर, भाषा, गणित विषयाचे प्रत्येकी एक प्रतिनिधी | सदस्य |
| 6. केंद्रीय मुख्याध्यापक | सदस्य |

➢ **गावस्तरा शाळास्तर समिती -:**

| | |
|---|---|
| 1. सरपंच | अध्यक्ष |
| 2. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शाळा विकास समिती अध्यक्ष | उपाध्यक्ष |

3. पोलीस पाटील - सदस्य
4. तलाठी सदस्य
5. ग्रामसेवक सदस्य
6. आरोग्य सेवक सदस्य
7. अंगणवाडी सेविका सदस्य
8. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी/ शिक्षण तज्ञ-1 सदस्य
9. सेवाजेष्ठ मुख्याध्यापक सदस्य सचिव

वरीलप्रमाणे विविध स्तरावर समित्या तात्काळ गठीत करून समिती अध्यक्ष व सदस्य सचिव यांचे सर्वेक्षणाच्या समन्वयाची जबाबदारी राहणार आहे. सोबत संदर्भिय पत्रान्वये प्राप्त SOP पाठविण्यात येत असून SOP मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनाचे तंतोतंत पालन करून **दि. 5 जुलै 2024 ते 20 जुलै 2024** या कालावधीत सदरचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात यावे.

सर्व संबधित कर्मचाऱ्यानी जबाबदारीपूर्वक काम करून शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत बालकांचे विहित प्रपत्रात भरलेल्या माहितीची पडताळणी व संगणकीकरण करून अहवाल **प्रपत्र अ, ब, क व ड** मध्ये दिलेल्या मुदतीत केंद्रप्रमुख यांच्या मार्फत दररोज सायं. ०५:०० वाजे पावेतो या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**सोबत** :- शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त प्रपत्र व सोबतच्या SOP जोडलेले आहे.

(बी. टी. पाटील)
**प्रशासनाधिकारी**
**मनपा शिक्षण विभाग, नाशिक**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
1. मा. आयुक्त सो मनपा नाशिक
2. मा शिक्षणाधिकारी (प्राथनिक) सो. जिल्हा परिषद नाशिक